# कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३४ /२०२४ दि. १७/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण – डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतुक उप विभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणुक–२०२४ चे अनुषंगाने **१४२ कल्याण पुर्व विधानसभा मतदार संघाची मतदान साहित्य/मतपेटया वाटपाची प्रक्रिया दिनांक १९/११/२०२४ रोजी, मतदान साहित्य स्विकृती प्रक्रिया दिनांक २०/११/२०२४ रोजी व दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया कडोंमनपा महिला उद्योग केंद्र, रॉयल रेसिडेन्सी, खडेगोळवली, कल्याण पूर्व** येथे पार पडणार आहे.

सदर दोन्ही परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **No Parking** | **१)** आनंद दिघे चौक ते अपर्णा डेअरी व अपर्णा डेअरी ते आनंद दिघे चौक रस्त्याचे दुर्तफा नो पार्कींग झोन करण्यात येत आहे. |
| **No Parking** | २) विठठ्लवाडी स्टेशन पुर्व ते महालक्ष्मी मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स व महालक्ष्मी मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स ते विठठ्लवाडी स्टेशन पुर्व रस्त्याचे दुर्तफा नो पार्कींग झोन करण्यात येत आहे. |

सदर अधिसूचना **दिनांक १८/११/२०२४ रोजी ते दिनांक २०/११/२०२४ रोजी पावेतो तसेच दिनांक २३/११/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. पासुन ते निवडणुक कार्यक्रम संपेपर्यत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

CamScanner

<u>प्रत</u> :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/-सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :- स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/- म.न.पा.कल्याण-डोंबिवली च्या संबंधीत अधिका-यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner


असिम चौक
उल्हासनगर-१,२,३ बदलापूर, कल्याणकडे
उल्हासनगर-४,५ कडे अंबरनाथ कडे
खडेगोळवली कडे
जुना पुणा लिंक रोड
विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन
विठ्ठलवाडी बस स्टॉप
CNG पंप
खडेगोळवली- विठ्ठलवाडी स्टेशन रोड
रस्ता बंद
नाला